श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये डिजिटल स्मार्ट क्लासरुम उभारण्यासाठीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण -१११८/प्र.क्र.२८१/एस एम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :

१) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांचे दि.४/०५/२०१५ चे वृत्त क्रमांक ७३.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे दि.१/१२/२०१८ चे पत्र.
३) मा.वित्त मंत्री यांचे २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील अर्थसंकल्पीय भाषण.
४) मा.वित्त मंत्री महोदयांची दि.८/१०/२०१८, १/११/२०१८, व दि.२ जानेवारी, २०१९ ची पत्रे.
५) अध्यक्ष, श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद यांचे दि.२८/०१/२०१९ चे पत्र.
६) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे दि.१/०३/२०१९ चे पत्र.
७) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे दि.१९/०७/२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :

श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था,औरंगाबाद या शैक्षणिक संस्थेच्या दि.०४/०५/२०१५ रोजी झालेल्या शताब्दी सोहळयात मा.मुख्यमंत्री महोदयांनी, संस्थेच्या भावी योजनेसाठी मदत देण्याचे घोषित केले होते. तद्नंतर मा.मंत्री (वित्त) यांनी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय भाषणात, "श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त रु.२ कोटी अनुदान देण्यासाठी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे" अशी घोषणा केली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्रमांक (६) अन्वये या विभागाकडे प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देऊन संस्थेस अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या ग्रामीण भागातील १२ शाळांमध्ये १२१ स्मार्ट क्लासरुम उभारण्यासाठी संस्थेस रु.२ कोटी इतके अनुदान एक विशेष बाब म्हणून देण्याच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

(१) परिशिष्ट एक मध्ये नमूद किंमती अंदाजित स्वरूपाच्या असून निविदा प्रक्रियेनंतर प्रकल्पाची एकूण अंतिम किंमत अंदाजित किंमतीपेक्षा जास्त होणार नाही, याची संस्थेने खबरदारी घ्यावी.
(२) या प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.३३३.६० लक्ष रूपये असून, त्यापैकी विशेष बाब अनुदान रू.२ कोटी शासनामार्फत देण्यात येईल व उर्वरित रक्कम संस्था उभी करील.
(३) मंजूर करण्यात आलेल्या अंदाजित रकमेपेक्षा खर्च अधिक होणार नाही व अधिकचा खर्च झाल्यास, तो संस्था स्वनिधीतून करील याबाबत संस्थेकडून हमीपत्र घेण्यात यावे.
(४) यासंदर्भात उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार निविदा प्रक्रिया राबवून विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्या सल्ल्याने कंत्राटदार/ पुरवठादाराची निवड करावी.

(५) कार्यारंभ आदेश प्रदान केल्यानंतर संस्थेने विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचेमार्फत शासनाकडे निधीची मागणी करावी. कामाच्या प्रगतीनुसार संस्थेस निधीचे वितरण करण्यात येईल.

(६) प्रत्यक्ष कामास सुरूवात झाल्यानंतर ५०% निधी वितरीत करण्यात येईल. तसेच तीन चतुर्थांश काम पूर्ण झाल्यानंतर त्यापुढील २५% निधी वितरीत करण्यात येईल व स्मार्ट क्लासरूम प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्वरित २५% निधीची मागणी करण्यापूर्वी उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(७) प्रस्तावातील कामांचा आणि संगणक व तत्सम यंत्रणेचा दर्जा उचित राहील, याबाबत संस्थेने दक्षता घ्यावी.

३. स्मार्ट क्लासरूम प्रकल्पातील कामांचा व अंदाजित किंमतीचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केला आहे.

४. सदरचा खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माधमिक शिक्षण, ११०, अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान (दत्तमत) (२२०२०४४२) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर रक्कमेचे प्रदान करण्यासाठी याद्वारे आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर प्रशासकीय मान्यता केवळ एकवेळची अपवादात्मक बाब म्हणून प्रदान करण्यात येत असून, अन्य प्रकरणी हे पुर्वोदाहरण म्हणून लागू असणार नाही.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.४२४/१९/व्य-५, दिनांक २९/०६/२०१९ अन्वये प्राप्त वित्त विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०६१४५८१४७३२१ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.08.06 15:03:48 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, मुंबई (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२, नागपूर (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता), नागपूर
५. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद व जालना
९. प्रशासन अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद
१०. लेखा अधिकारी, कोषागार कार्यालय, औरंगाबाद
११. कक्ष अधिकारी (व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. निवडनस्ती (एस एम-१).

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १११८/प्र.क्र.२८१/एस एम-१, दिनांक ०६/०८/२०१९ सोबतचे परिशिष्ट

Sr.No.	Item	Cost per unit Rs.	No of Units	Total (Rs.)
1	Civil work and sound proof windows, other facilities	95000	121	1,14,95,000
2	Networking and Cabling	15000	121	18,15,000
3	Smart Projector and Related Equipments	100000	121	1,21,00,000
4	Laptop	35800	121	43,31,800
5	Educational Software/ Licence	29900	121	36,17,900
		Grand Total-	Rs.	3,33,59,700
		Round sum say	Rs.	3,33,60,000